# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र

### शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रवेश प्रक्रिया

### अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्याबाबत सूचना

दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. व एम.बी.ए. या वर्गामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी, त्यांनी निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर (महाविद्यालयामध्ये) खालीलप्रमाणे कागदपत्रे शनिवार दि. १३/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

१) प्रवेशअर्ज (दोन प्रती)

२) आधारकार्ड (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

३) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

४) माध्यमिक शिक्षण (इयत्ता १०वीचे) प्रमाणपत्र (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

५) विद्यार्थ्याच्या नावामध्ये बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा (मूळ प्रत सोबत ठेवावी व झेरॉक्सप्रत जमा करावी)

६) पुढीलपैकी एक कागदपत्र (जे लागू असेल ते) (मूळ प्रत):

i) याआधीचा प्रवेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात नियमित विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर शाळा सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) आवश्यक आहे.

ii) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अथवा विद्यापीठ विभागात नियमित किंवा बहिःस्थ विद्यार्थी म्हणून घेतला असेल तर, संबंधित विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.

iii) याआधीचा प्रवेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळामध्ये बहिःस्थ (खाजगी) विद्यार्थी म्हणून घेतला असेल किंवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही शिक्षण मंडळामध्ये घेतला असेल तर संबंधित शिक्षण मंडळाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे. याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा इतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये घेतला असेल तर संबंधित विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

iv) विद्यार्थी सध्या अन्य अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास संबंधित महाविद्यालयाचे अथवा विद्यापीठाचे बोनाफाइड प्रमाणपत्र आवश्यक आहे. (एकाच वेळेस दोन अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता)

v) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा)' या विभागामध्ये घेतला असेल तर स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक नाही. अशा विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेची प्रत जमा करावी.

- अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमाकरतेवेळी विद्यार्थ्याकडे शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर / स्थलांतर / बोनाफाइड प्रमाणपत्र (Leaving / Transfer / Migration / Bonafide Certificate) नसेल तर विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित होईल.

- अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश अर्जातील वैयक्तिक तपशील (नाव, मोबाईल क्रमांक, इ-मेलआयडी, पत्ता, जन्मदिनांक इ.) काळजीपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.

❖ प्रवेश अर्ज (छापीलप्रत) तसेच आवश्यक कागदपत्रे मुदतीत जमा न केल्यास प्रवेश निश्चित होणार नाही, याची प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# <u>हमीपत्र</u>

दिनांक / ___ / ___२०२५

प्रति,
मा. संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषय: प्रवेश अर्ज जमा करण्याबाबत...**

मी ________________________________________________ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की मी आपल्या केंद्रामध्ये प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम./एम.ए./एम.कॉम./एम.बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा प्रवेश अर्क क्र. २०२५________________ आहे. अर्जासोबत जमा करावयाचे शाळा सोडल्याचा दाखला / स्थानांतर / स्थलांतर / बोनाफाइड प्रमाणपत्र माझ्याकडे सध्या उपलब्ध नसून ते मिळविण्यासाठी मी याआधी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामध्ये / विद्यापीठामध्ये अर्ज केलेला आहे. सदर प्रमाणपत्र मी अभ्यास केंद्रावर विहित मुदतीत जमा करेन. सदर प्रमाणपत्र जमा केल्यानंतरच माझा प्रवेश निश्चित होईल, याची मला माहिती आहे. तरी, कृपया माझा प्रवेश अर्ज स्वीकारण्यात यावा, ही विनंती.

विद्यार्थ्याची सही __________________

विद्यार्थ्याचे नाव: ________________________________________

---

For Study Centre use only

Sign of Study Centre Coordinator:________________ Seal of Study Centre

---

# प्रवेश अर्जावरील विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करावयाचा अर्ज

दिनांक / ___ / ___२०२५

प्रति,
मा. संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषय: प्रवेश अर्जावरील विद्यार्थी माहितीत दुरुस्ती करण्याबाबत...**

मी ______________________________________________ विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की मी आपल्या केंद्रामध्ये प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम./एम.ए./एम.कॉम./एम.बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला असून माझा प्रवेश अर्क क्र. २०२५______________ आहे. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जातील माझ्या माहितीत पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी, ही विनंती.

| तपशील | छापील प्रवेश अर्जामध्ये असलेली माहिती | माहितीत करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| विद्यार्थ्याचे नाव (इंग्लिशमधील) | | |
| विद्यार्थ्याचे नाव (मराठीमधील) | | |
| पत्ता | | |
| मोबाईल क्रमांक | | |
| इमेल आयडी- | | |
| इतर | | |

(वरीलपैकी ज्या माहितीत दुरुस्ती करावयाची आहे, तोच तपशील भरावा )

विद्यार्थ्याची सही ________________

---

**For Study Centre use only**

Sign of Study Centre Coordinator:______________________________ Seal of Study Centre

---

**For CDOE office use only**